ARTHA, Poona-4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १९ एप्रिल, १९६१ | अंक ८

विविध माहिती

सर्वांत गलिच्छ शहर, कलकत्ता—कलकत्ता शहरांत नागरिक स्वास्थ्य-संघटनेतर्फे एक आरोग्यविषयक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना मध्यवर्ती सरकारचे आरोग्यमंत्री श्री. डी. पी. करमरकर म्हणाले कीं, कलकत्ता हें भारतामधील सर्वांत गलिच्छ शहर आहे. कलकत्त्याच्या लोकांना नागरिकांच्या कर्तव्याची जाणीव नाहीं आणि कलकत्ता कॉर्पोरेशनला शहराच्या प्रचंड लोकसंख्येची नीट व्यवस्था ठेवतां येत नाहीं.

कारखान्यांचे परवाने रद्द—देशाच्या निरनिराळ्या भागांतील ५ कारखान्यांना मध्यप्रदेशांत कारखाने काढण्याचे परवाने राज्य सरकारनें दिले होते. परंतु कांहीं कारणासाठीं आतां हे परवाने रद्द करण्यांत आले आहेत. ह्या कारखान्यांपैकी तीन कारखाने सिमेंटचे होते, एक हार्डबोर्डचा होता व एक फायर ब्रिकसचा होता. परवाने रद्द करण्याचीं कारणें जाहीर केलेलीं नाहींत.

छोट्या मोटारींचें उत्पादन—पश्चिम जर्मनीच्या साह्यानें भारतांत 'व्होक्सवॅगन' ह्या छोट्या मोटारी तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. ह्याबाबत नेमण्यांत आलेल्या पांडे कमिटीनें युरोप व जपानमधील कांहीं कंपन्यांच्या सहकार्याचीहि दखल घेतली आहे. रेनॉल्ड ह्या फ्रेंच कंपनीची ह्याबाबतची योजना सर्वांत अधिक विचार करण्यासारखी आहे.

खोल समुद्रांतील मच्छीमारी—आंध्र प्रदेशाला विशाखापट्टम् ते तुतिकोरीनपर्यंत १,००० मैलांचा समुद्रकिनारा लाभला आहे. त्याचा फायदा घेऊन बंगालच्या उपसागरांत खोल समुद्रांतील मच्छीमारीच्या व्यवसायाचा विकास करण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकारतर्फे पुरस्कृत करण्यांत आलेल्या ह्या योजनेला तीन कोटी रुपये खर्च येईल.

अल्पबचतींत सुरत आघाडीवर—गुजरात राज्यांतील सर्व जिल्ह्यां न अल्पबचतीच्या बाबतींत सुरत जिल्हा आघाडीवर आहे. ह्या वर्षीच्या फेब्रुआरी महिन्याच्या अखेर जिल्ह्यानें १·९६ कोटी रुपये अल्पबचतींत गुंतविलें आहेत. जिल्ह्याचें वार्षिक उद्दिष्ट १·५० कोटी रुपये आहे. हा जिल्हा राज्यांत सर्वांत मोठा आहे.

अंतराळ प्रवासाची शक्यता—उपग्रहांत माणूस पाठवून तो पुन्हा पृथ्वीवर परत आणण्याचें शास्त्रीय ज्ञान रशिआजवळ गेले कित्येक महिने आहे. परंतु आंत बसलेल्या माणसाच्या आरोग्याला धक्का लागणार नाहीं अशी खात्री होईपर्यंत हा प्रयोग करण्यांत येणार नाहीं अशी वार्ता प्रसिद्ध झाली आहे.

अमेरिकेमधील बेकारांना साह्य—अमेरिकेंत सध्यां बेकारीची लाट उसळली आहे. त्यामुळें बेकारांची संख्या फुगत चालली आहे. बेकार कामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष मि. केनेडी ह्यांनीं १०० कोटी डॉलर्स मंजूर करणाऱ्या कायद्यावर सही केली आहे. अमेरिकेंत सध्यां ७ लाख कामगार बेकार आहेत. त्यांना मदत करण्यासाठी व ज्या २५ लाख कामगारांना सध्यां मदत चालू आहे त्यांना ती मदत चालू ठेवण्यासाठी वरील रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

कच्छमधील पक्ष्यांचें जीवन—स्थलांतर करून कच्छमध्यें येणाऱ्या पक्ष्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठीं दोन पक्षीशास्त्रज्ञ तेथें गेले आहेत. सैबेरिआसारख्या उत्तरेकडील देशांतून उन्हाळ्यांत कच्छमध्यें येणाऱ्या पक्ष्यांच्या सवयींचा विशेष अभ्यास करण्यांत येणार आहे. हे पक्षी कच्छमध्यें मोठ्या प्रमाणावर येतात.

स्कूटर्सचा कारखाना—लुधिआना येथील एका कारखान्यानें जपानच्या साह्यानें स्कूटर्स बनविण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारनें आपली संमति जाहीर केली आहे. प्रत्येक स्कूटरमागें सुमारें १५० रुपये किंमतीचे भाग जपानमधून आयात करावे लागतील. बाकी सर्व बनावट भारतांतच होईल.

अणुशक्तीवरील सर्वांत मोठें वीजकेंद्र—अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें जगांतील सर्वांत मोठें वीजकेंद्र उभारण्याचें अमेरिकेच्या सरकारनें ठरविलें आहे. केंद्रांत ७ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्याचा इरादा आहे. ब्रिटन व रशिया हे देशहि ४ ते ६ लाख किलोवॅट वीज निर्माण करणारी अणुशक्ति चलित वीज-केंद्रें उभारण्याचा विचार करीत आहेत.

सीलोन रशिआचें तेल घेणार – सीलोनचें सरकार रशिआकडून दरसाल ४०,००० टन पेट्रोल व तद्जन्य पदार्थ विकत घेणार आहे. रशिआकडून येणाऱ्या तेलपदार्थांचें वांटप करण्यासाठीं सीलोनचें सरकार स्टेट ऑइल कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. सीलोनकडून चहा, रबर व खोबऱ्याचें तेल घेऊन त्याच्या बदला यंत्रसामग्री देण्याचें रशिआनें कबूल केलें आहे.

पाकिस्तानची पहिली अणुभट्टी – पाकिस्तानच्या अणुशक्ति मंडळानें पाकिस्तानांतील पहिली अणुभट्टी उभारण्याचें काम एका अमेरिकन कंपनीकडे सोंपविलें आहे. ही अणुभट्टी रावळपिंडीपासून जवळच इस्लामाबाद येथें उभारण्यांत येणार आहे. अणुभट्टीची उभारणी १९६४ सालीं पुरी होईल. ह्या कामासाठीं लागणारा खर्च अमेरिका करणार आहे.

परदेशांचें भारताला साहाय्य : मंजूर व वापरलेल्या रकमा*

(आंकडे कोटी रुपयांचे)

मदतगार		पहिल्या पं. वा. योजनेअखेर मंजुरी	प. पं. वा. योजने-अखेर वापर	दुसऱ्या पं. वा. योजनेंत उपलब्ध रकम	दुसऱ्या पं. वा. योजनेच्या पहिल्या चार वर्षांतील वापर	डिसेंबर १९६० अखेरची मंजुरी
अमेरिका	...	२२०.३४	१३४.६०	६७३.९२	२००.८५	१४८०.३२
रशिया	...	६४.३८	—	३२५.०३	६६.८१	३८४.५६
ग्रेटब्रिटन	...	०.३९	.०३	१०३.१०	८२.८३	१६३.१३
कॅनडा	...	३२.३४	१९.७०	७४.०७	६३.७३	१०६.२८
ऑस्ट्रेलिया	...	११.०८	५.२०	७.०७	६.१५	१२.२७
न्यूझीलंड	...	१.७२	.३३	३.१०	२.८९	३.४३
प. जर्मनी	...	—	—	९५.९७	७२.९८	१५२.६७
जपान	...	—	—	२७.६१	३.९७	२७.६१
झेकोस्लोव्हाकिया	...	—	—	२३.१०	—	२३.१०
रुमानिया	...	—	—	५.२३	—	५.२३
युगोस्लोव्हाकिया	...	—	—	१९.०५	—	१९.०५
नॉर्वे	...	०.६६	०.६६	१.५३	१.५३	२.१९
पोलंड	...	—	—	—	—	१४.३०
जागतिक बँक	...	५७.७०	३३.८०	२४८.१४	१८६.०४	३१५.२८
फोर्ड फौंडेशन	...	५.६१	२.२६	८.८२	३.७१	१४.२०
यु. नेशन्स स्पेशल फंड	...	—	—	१.३१	—	४.१६
एकूण	...	३९४.२२	१९६.५८	१६१७.२६	६९१.४९	२०२७.७८

*विक्रेत्यांची उधारी, रॉकफेलर फौंडेशनच्या देणग्या, अमेरिकेंतील खासगी संस्थांची मदत, पी. एल्. ४८० च्या II व II खालील मदत आणि नेदरलंड व स्वित्सरलंड ह्यांची मदत, ह्यांचा वरील आंकड्यांत समावेश नाहीं.

दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

(१) तीन वर्षे मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.
(२) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲडव्होकेट, चेअरमन
के. डी. शिराळकर, मॅनेजर.

भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :— भोर, जि. पुणें.

शाखा :— पुणें, पाली व शिरवळ

अधिकृत भांडवल ... रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल ... रु. ५,००,०००
वसूल भांडवल ... रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् ... रु. ६१,०००

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष
न. भू. ना. दां. थोपटे, उपाध्यक्ष
श्री. गो. बा. देवी
श्री. बा. ग. धडुके

अर्थ

बुधवार, ता. १९ एप्रिल, १९६१

संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

साखरेचें उत्पादन वाढल्यामुळें कारखान्यांना चिंता

इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डी. डी. पुरी ह्यांनीं एक पत्रकार-परिषद् घेऊन साखरेच्या कारखान्यांपुढें सध्यां असलेल्या अडचणींचें विवेचन केलें आहे. पत्रकारांसमोर बोलतांना ते म्हणाले कीं, साखरेच्या धंद्यांत आजपर्यंत कधींहि उद्भवली नव्हती अशी अडचणीची परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. पुढील हंगामाच्या प्रारंभीं देशांत १५ लाख टन साखर शिल्लक राहील असा अंदाज आहे. इतकी साखर सांठवून ठेवण्याची सोय कारखान्यांजवळ नाहीं. शिवाय ह्या साखरेंत अडकून पडणारा पैसाहि त्यांना परवडण्यासारखा नाहीं. चालू वर्षीं साखरेचा एकूण पुरवठा ३५·५ लाख टन इतका होईल. साखरेचें उत्पादन ३० लाख टन होईल आणि पूर्वींच्या हंगामांतील शिल्लकी साखर ५·५ लाख टन आहे. पुढील वर्षीं देशांत २१ लाख टन साखर खपेल असा अंदाज आहे. हंगामाच्या शेवटीं ५ लाख टन साखर पुढील हंगामापर्यंत राखून ठेवावयाची असें म्हटल्यास सुमारें ९·५ लाख टन साखर निर्यात करण्यासाठी उरेल असें दिसतें. साखरेच्या तारणावर बँकांकडून मिळवावयाच्या पैशाची जास्तींत जास्त मर्यादा बहुतेक कारखान्यांनीं आतांच गांठलेली आहे. त्यामुळें कारखान्यांना भविष्यकाळासाठी लागणारा पैसा बँकांकडून मिळणें कठीण झालेलें आहे. साखर-कारखान्यांजवळ शिल्लक असलेल्या साखरेची विक्री झाल्याशिवाय कारखान्यांना रोकड पैसा मिळणें अशक्य झालेलें आहे अगर होत आहे. साखरेची निर्यात करावी तर ह्या व्यवहारांत मोठी खोट सोसावी लागते. तेव्हां देशांतील साखरेच्या किंमती वाढविणें एवढा एकच मार्ग राहिलेला आहे.

कारखान्याच्या जागेवरील साखरेची किंमत दर मणामागें ५·५१ रुपयांनीं वाढवून देण्यांत आली तर ह्या धंद्यावर आलेल्या संकटाला कारखाने थोडेंतरी तोंड देऊं शकतील. किंमत वाढवून देण्यांत आली तर साखरेच्या निर्यातीमुळें होणारें नुकसान आणि साखरधंद्याच्या वेतनमंडळानें सुचविलेल्या कामगारांच्या पगाराच्या श्रेणी इत्यादींमुळें येणारा जादा खर्च सोसणें साखर-धंद्याला शक्य होईल. एरवीं ह्या धंद्याला वाढता खर्च सोसणें शक्य होणार नाहीं. साखर-धंद्याच्या वेतनमंडळानें सुचविलेली वेतनश्रेणी अंमलांत आणणें अर्थात्‌च शक्य होणार नाहीं. साखरेची किंमत वाढल्यामुळें तिच्या खपांत थोडीशी घट होण्याचा संभव आहे, पण पूर्वी झालें त्याप्रमाणें खप पुन्हां स्थिरपदावर येईल अशी अपेक्षा आहे. साखरेच्या किंमतींत होणारे चढउतार लक्षांत घेऊन साखर विक्रीसाठी खुली करणें सरकारला जमत नसेल तर साखरेवरील नियंत्रण रद्द करण्यांत अर्थ नाहीं. तसें केल्यानें देशांतील साखरेच्या किंमती एकदम घसरतील आणि त्याचा धंद्यावर विपरीत परिणाम होईल. साखरेच्या किंमतींत सगळ्यांत अधिक भाग उसाच्या किंमतीचा असतो. साखर निर्माण करणाऱ्या इतर देशांशीं तुलना करतां भारतामधील मजुरी व संस्करणाचा खर्च अतिशय कमी आहे. साखरेची किंमत वाढवून देणें सरकारला शक्य नसेल तर किंमती जुळवून घेण्यासाठी इतर मार्गांचा अवलंब करावा लागेल. साखरेवरील अबकारी कर रद्द करणें हा त्यांतील एक मार्ग आहे. भारताच्या निर्यातीला हातभार लावणारा एक प्रमुख धंदा म्हणून साखरेच्या धंद्याचें नियोजन करणें इष्ट ठरणार नाहीं. उसाच्या किंमती खालीं आणून धंद्याचा उत्पादन खर्च कमी करण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

अहमदाबादच्या कापडधंद्याची सांवत्सरी

भारतामधील मोठ्या व संघटित उद्योगधंद्यांपैकीं कापडाच्या गिरण्या हा एक महत्त्वाचा धंदा आहे. अलीकडील काळांत परदेशीय चलन मिळविण्याच्या कामींहि त्याला महत्त्व प्राप्त झालें आहे. अहमदाबाद येथील कापडाच्या धंद्याचा शतसांवत्सरिक उत्सव नुकताच साजरा झाला. ह्या समारंभाचें उद्घाटन पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केलें. समारंभाच्या निमित्तानें अहमदाबाद येथील गिरणी मालक संघानें एक भव्य प्रदर्शनहि भरविलें होतें. प्रदर्शनांत अहमदाबाद येथील कापड-धंद्याची कसकशी प्रगति होत गेली त्याची माहिती करून देण्यांत आलेली आहे. अहमदाबादमधील कापडधंद्याचा इतिहासच प्रदर्शनाच्या रूपानें मांडण्यांत आलेला आहे. अहमदाबादमध्यें शेठ रणछोडलाल छोटालाल ह्या व्यापाऱ्यानें प्रथम १८५९ सालीं कापड तयार करण्यासाठी समाईक भांडवलाची कंपनी काढली. त्यापूर्वी सुमारें ३० वर्षें असाच एक प्रयत्न करण्यांत आला होता. पण तो यशस्वी झाला नाहीं. ह्या पहिल्या कंपनीचें वसूल भांडवल अवघें १ लाख रुपये होतें; आणि कंपनीनें सुरवातीला एक लहानशी सुताची गिरणीच फक्त काढली. ३० मे, १८६१ रोजीं गिरणी उभारण्याचें काम पूर्ण झालें. त्या वेळीं तींत २,५०० चात्या व ६३ कामगार होते. आज अहमदाबाद शहरांत ६६ गिरण्या असून त्यामधील चात्यांची संख्या २० लाखांपेक्षा अधिक आहे. मागांची संख्या ४२,५६९ असून कामगारांची संख्या १,३०,००० आहे. भारतांत कापडाच्या गिरण्यांत जेवढें कापड तयार होतें त्याच्या एकचतुर्थांश कापड अहमदाबादच्या गिरण्या तयार करतात. अहमदाबादमध्यें तलम व अति तलम कापड तयार होतें आणि तें जगांतील कोठल्याहि देशाच्या कापडाशीं स्पर्धा करूं शकतें.

दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

दि मिरज स्टेट बँक लि. ला, १९६० सालीं १,०५,२३६ रु. नफा झाला. इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडाकडे १८,००० रु. वर्ग करून आणि ३२,००० रु. ची इन्कमटॅक्सची तरतूद करून भागदारांना करपात्र ८·५८% डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. बँकेचें वसूल भांडवल ६ लक्ष रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ७½ लक्ष रु. चे होत आहेत. ठेवी ८३½ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें ४४½ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत व ५० लक्ष रु. रोख, बँकांत व सरकारी रोख्यांत आहेत. यावरून बँकेच्या सुस्थितीची कल्पना येईल. बँकेची वार्षिक सभा दि. २७ एप्रिल रोजीं होणार आहे.

अपघाती मृत्यूबद्दल वारसांना नुकसानभरपाई नाहीं

ता. २४ जून १९५८ रोजीं मुंबईमधील उपनगरी रेल्वेवर एक अपघात होऊन त्यांत शाम आपटे ह्या नांवाचा लोकलगाडीवरील मोटारमन ठार झाला. रेल्वेमार्गावरील मुंब्रा व दिवा ह्या स्टेशनांच्या दरम्यान हा अपघात झाला. दोन गाड्यांपैकी एक गाडी शाम आपटे चालवीत होता. आपटे ह्यांच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांनीं इंडियन रेल्वेज ॲक्टच्या ८२ अ कलमाखाली नुकसानभरपाईची मागणी केली होती. ठाणा येथील क्लेम्स कमिशनरनें अर्जदारांचा अर्ज फेटाळून लावला होता. त्यानंतर वारसांनीं महाराष्ट्र हायकोर्टाकडे ह्या निकालाविरुद्ध अपील केलें होतें. हायकोर्टानें आपटे ह्यांच्या वारसांना नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क नाहीं असा निर्णय दिला आहे. हायकोर्टानें केलेल्या युक्तिवादाचा आशय पुढीलप्रमाणें आहे. आपटे हा लोकल गाडीवरील एक मोटारमन होता. दोन रेल्वे गाड्यांच्या टकरींत तो मृत्यु पावला हें खरें; परंतु तो रेल्वेगाडींत उतारू म्हणून प्रवास करीत नव्हता. रेल्वेचा नोकर म्हणून तो आपलें काम करीत होता. रेल्वेगाडीवर काम करणाऱ्या रेल्वेच्या नोकरांचा हेतु प्रवास करण्याचा नसतो. ह्या विशिष्ट बाबतींत मोटारमनचें काम गाडी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठरलेल्या स्थळीं नेणें एवढेंच होतें. रेल्वे ॲक्टच्या ८२ अ कलमाप्रमाणें नुकसानभरपाई मिळण्याची जी तरतूद करण्यांत आली आहे, ती रेल्वेंत उतारू म्हणून प्रवास करणाऱ्या लोकांच्या पुरतीच मर्यादित आहे, इतर लोकांना नुकसानभरपाई देण्याची सोय त्या कलमांत नाहीं; आपटे ह्याला प्रवासी म्हणतां येणार नाहीं. त्यामुळें अर्थातच त्याच्या वारसांना त्याच्या मृत्यूबद्दल ८२ अ कलमाखाली नुकसानभरपाई मागण्याचा हक्क पोंचत नाहीं.

रशिअन बनावटीच्या वाहतुकीच्या विमानांचा उपयोग

चीननें भारताच्या उत्तर सीमेवरील कांहीं भाग व्यापल्यापासून संरक्षणाच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष देण्यांत येऊं लागलें आहे. भारताची उत्तर सरहद्द डोंगराळ असल्यानें ह्या भागांत लष्कराच्या हालचालीला सोयीचे रस्ते नाहींत. ते बांधण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें एका बोर्डाची स्थापना केली आहे. रस्ते तयार करण्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री रशिअन विमानांच्या साह्यानें नेण्यांत येत आहे. ही जड यंत्रसामग्री वाहून नेण्यासाठी भारत सरकारनें ए. एन्. १२ ह्या प्रकारचीं आठ विमानें रशिआकडून मागविलीं आहेत. त्यांपैकीं दोनच तूर्त आलीं असून त्यांचा वापर सुरू करण्यांत आला आहे. भारतीय विमानदलांत सध्यां जीं वाहतुकीचीं विमानें आहेत त्यांच्यापेक्षाहि रशिअन विमानें अधिक वजनाचें सामान नेऊं शकतात. तीं २८ ते ३० हजार फुटांवरून उड्डाण करूं शकतात आणि त्यांचा वेग तासाला ४०० मैलांपेक्षाहि थोडा अधिक आहे. विशेष म्हणजे चढण्या-उतरण्यासाठीं ह्या विमानांना अगदीं पक्क्या धावपट्टीची आवश्यकता लागत नाहीं. धावपट्टीची लांबीहि फारशी मोठी लागत नाहीं. त्यामुळें डोंगराळ प्रदेशांत त्यांचा चांगला उपयोग होऊं शकतो. विमानें चालविण्याचें शिक्षण घेण्यासाठीं हिंदी वैमानिकांची एक तुकडी रशिआंत पाठविण्यांत आली होती. चांगलें कसून शिक्षण घेऊन ही तुकडी आतां परत आली आहे. चीन व भारत ह्यांच्यामधील उत्तरेकडील सरहद्द सुमारें २,५०० मैल लांबीची आहे. इतक्या दीर्घ सरहद्दीवर निरनिराळ्या उंचीवर असणाऱ्या विमानतळावर हीं विमानें ये-जा करूं शकतील कीं नाहीं ह्याविषयीं लोकसभेंत शंका व्यक्त करण्यांत आली होती. पण, लडाखमधील विमानतळावर आतां ह्या विमानांचा वापर यशस्वीपणें करण्यांत येत आहे.

वीज कंपनी सरकारनें ताब्यांत घेतली

विजापूर पॉवर सप्लाय कंपनी ता. १ एप्रिलपासून म्हैसूर सरकारच्या वीज बोर्डानें आपल्या ताब्यांत घेतली आहे ही कंपनी १९२८ सालीं स्थापन करण्यांत आली असल्याचें तिच्या मालकानें सांगितलें. कंपनीच्या यंत्रसामग्रीला लागणारे सुटे भाग मिळविण्याच्या कामीं अलीकडे फार त्रास पडूं लागला होता. त्यामुळें कंपनी सरकारच्या ताब्यांत देण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. वीजबोर्डानें कंपनीच्या मालकाला २,७५,००० रुपये नुकसानभरपाईदाखल दिले.

राजकोटला फिल्टर्ड पाण्याचा पुरवठा

मे, १९६१ पासून राजकोट शहराला फिल्टर्ड पाण्याचा पुरवठा होऊं लागणार आहे. पाणी शुद्ध करण्याची आठ लाख रुपयांची यंत्रसामग्री राजकोट नगरपालिकेनें बसविली आहे. ह्या यंत्रसामग्रीच्या साह्यानें दररोज सुमारें ४५ लाख गॅलन पाणी शुद्ध करण्यांत येईल. कांहीं कालानें दररोज ६० लाख गॅलन पाणी शुद्ध करण्याची सोय करण्यांत येणार आहे. शुद्ध पाणी मिळूं लागल्यावर राजकोटमधील लोकांचें आरोग्य सुधारण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

कुवैतमधील खास स्वरूपाचें भारतीय चलन

कुवैत सरकारनें दिनार नांवाचें नवें स्थानिक चलन चालू करण्याचा निर्णय घेतला असून, १ एप्रिल, १९६१ पासून तें प्रचारांत आलें आहे. यामुळें त्या देशांत प्रचारांत असलेल्या खास प्रकारच्या भारतीय रुपयाच्या नोटा आणि नाणीं काढून घेण्याची व्यवस्था करणें जरूर झालें आहे व त्या बाबतींत कुवैत सरकार आणि भारत सरकार यांच्या प्रतिनिधींमध्यें कांहीं बोलणीं चालू होतीं. त्यानुसार सध्यां त्या देशांत प्रचारांत असलेल्या भारतीय नोटा व नाणीं कशा रीतीनें व किती मुदतींत चलनांतून काढून घ्यावीं या बाबतींत उभय देशांच्या प्रतिनिधींचें मतैक्य झालें आहे.

रशिआकडून तेलाची आणखी आयात

भारत सरकारच्या मालकीची इंडिअन ऑइल कंपनी रशिआकडून आणखी तेल आयात करीत आहे. रशिअन तेलाचा चौथा हप्ता घेऊन एक मोठी तेलवाहू बोट नुकतीच मुंबई बंदरांत आली आहे. बोटीनें ३१ लाख गॅलन्स अथवा १०,९६३ टन तेल आणलें आहे. तेलांत उत्तम प्रतीचें घासलेट आणि हायस्पीड डिझेल ह्यांचा समावेश आहे. हा हप्ता धरून इंडिअन ऑइल कंपनीनें आतांपर्यंत १ कोटी गॅलन उत्तम प्रतीचा पेट्रोलिअमचा माल आयात केला आहे. विशेष म्हणजे, ह्या आयातीमुळें भारताच्या परदेशीय चलनाच्या सांठ्यावर थोडासुद्धां भार पडलेला नाहीं. इंडिअन ऑइल कंपनी रशिआंतून आयात केलेल्या तेलाचें वांटप सात राज्यांत करीत आहे.

अल्बानिआची चीनकडे मदतीची मागणी

अल्बानिआनें आपलें औद्योगीकरण साधण्यासाठी रशिआकडे आर्थिक मदतीची मागणी केली होती. परंतु रशिआकडून नकार आल्यामुळें अल्बानिआचा पंचवार्षिक कार्यक्रम धोक्यांत आला आहे. आतां अल्बानिआची नियोजन समिति चीनकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. अल्बानिआला आपला पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी ३ कोटी, ७० लाख डॉलर्सची गरज आहे.

बँक कर्मचाऱ्यांचे कामाचे कमी तास

तुलनात्मक आढावा

भारतांतील बँक कर्मचारी इतर देशांतील बँक कर्मचाऱ्यांचे मानानें जास्त दिवस सुट्या उपभोगतात, त्यांना रजा अधिक दिवस मिळते आणि त्यांचे कामाचे साप्ताहिक तास कमी आहेत, हें सिद्ध करणारे तुलनात्मक आंकडे दि इंडियन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. सी. एच. भाभा, ह्यांनीं आपल्या वार्षिक भाषणांत दिले आहेत. प्रथम वार्षिक सुट्यांचे आंकडे पाहूं.

वार्षिक सुट्या

देश	वार्षिक सुट्या
बेल्जम	८
डेन्मार्क	९
ग्रेट ब्रिटन	१०
नॉर्वे	१०
स्वीडन	१२
इटली	१४
स्वित्झरलंड	१६
जपान	२२
नेदरलंडस्	७
(अधिक प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारीं सुट्टी)	
प. जर्मनी	१५
(अधिक प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारीं सुट्टी)	
अमेरिका	११
	(अधिक प्रत्येक शनिवारीं सुट्टी)
भारत	२५

हक्काची रजा

देश	रजेचे दिवस
अमेरिका	१४
ग्रेट ब्रिटन	१८
प. जर्मनी	१८–२४
	(वयोमानाप्रमाणें)
भारत	३०
	('अ' आणि 'ब' वर्गांतील कर्मचारी)
,,	२२½
	('क' आणि 'ड' वर्गांतील कर्मचारी)

कामाचे साप्ताहिक दिवस

देश	कामाचे साप्ताहिक दिवस
अमेरिका	४०
ग्रेट ब्रिटन	४२
प. जर्मनी	४३¾
भारत	३६¾

ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे, भारतांतील कर्मचारी दरसाल इतर देशांतील कर्मचाऱ्यांच्या मानानें कितीतरी कमी तास काम करतो.

कामाचे वार्षिक तास

देश	कामाचे वार्षिक तास
अमेरिका	१९२०
ग्रेट ब्रिटन	१९५०
प. जर्मनी	१९७०
भारत	१६१०

अमेरिकन बँकांना प्रत्येक १० लक्ष डॉलर्सच्या जिंदगीच्या व्यवस्थेसाठी लागणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सरासरी संख्येंत गेल्या दहा वर्षांत वाढ झालेली नाहीं; १९४९ व १९५९ चे आंकडे अनुक्रमें २·३९ व २·३८ असे आहेत. भारतांतील बँकांना प्रत्येक १० लक्ष रुपयांच्या जिंदगीच्या व्यवस्थेसाठी लागणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सरासरी संख्या १९५५ मध्यें १५·७ होती, ती १९५९ मध्यें १९ झाली. अमेरिकेंत १० लक्ष डॉलर्सच्या व्यवस्थेला जेवढीं माणसें लागतात, त्याच्या आठ पट माणसें भारतांत १० लक्ष रुपयांच्या व्यवस्थेला लागतात! १९५५ ते १९५९ ह्या मुदतींत, भारतीय बँकांच्या अधिकाऱ्यांचें दरमाणशीं वार्षिक उत्पन्न ५,४१५ रु. चें ६,२५८ रु. इतकें झालें. म्हणजे चार वर्षांत तें १३% वाढलें. त्याच मुदतींत, कारकून आणि पट्टेवाले ह्यांचें उत्पन्न १,७४१ रु. चें २,११३ रु. झालें. म्हणजे, त्यांत २०% वाढ झाली.

आर्थिक विकासाची आवश्यकता तीव्र आणि तांतडीची असतांना भारतांतील बँक कर्मचाऱ्यांचे कामाचे तास इतके कमी असावे आणि बँकांचा कारभार खर्चिक होत जावा, ही गोष्ट देशहिताची नाहीं; त्यामुळें बँकांच्या उपयुक्ततेस बाध येतो, असें श्री. भाभा ह्यांनीं आग्रहपूर्वक प्रतिपादलें आहे.

संस्थानिकांकडून यावयाची थकबाकी— भारतामधील माजी संस्थानिकांपैकी ३२ संस्थानिकांनीं चालू वर्षाच्या आरंभीं त्यांच्यावर बसविण्यांत आलेल्या खर्चावरील कराची रकम दिलेली नाहीं अशी माहिती लोकसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आली. ह्या सर्व संस्थानिकांकडे मिळून सुमारें १५·२८ लाख रुपये कराची रकम यावयाची आहे. ह्या थकबाकीच्या वसुलीबाबत सरकार काय उपाय योजणार तें समजलेलें नाहीं.

मुलींसाठी तांत्रिक शिक्षणसंस्था — तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत लखनौ येथें तांत्रिक शिक्षण देण्याची एक शाळा स्थापन करण्याचें उत्तरप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ह्या शाळेंत २७० विद्यार्थिनींना शिक्षण देण्याची सोय करण्यांत येणार आहे. शिक्षणासाठी फी घेण्यांत येणार नाहीं. ५० टक्के विद्यार्थिनींना शिष्यवृत्त्या देण्यांत येणार आहेत. एंजिनिअरिंग व धंदेशिक्षण मुलींना देण्यांत येईल.

हिंदची अमेरिकेला मदत—मुंबईमधील अमेरिकेचे कौन्सल जनरल मि. कार ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, सुमारें १०० वर्षांपूर्वी अमेरिकेंतील ओहिओ संस्थानांतील कालवे बांधण्यासाठी अमेरिकेनें हिंदी इंजिनिअरांची मदत मुद्दाम मागवून घेतली होती. मलबार किनाऱ्यावर कालव्यांचें जें जाळें पसरलें आहे त्याची माहिती अमेरिकेला लागली होती. म्हणून हिंदी इंजिनिअर्सकरवीं ओहिओमधील काम करवून घेण्यांत आलें.

अमेरिका-रशिआ व्यापार — रशिआबरोबर होणाऱ्या व्यापारांत वाढ व्हावी म्हणून कांहीं अमेरिकन उद्योगपतींनीं पुढाकार घेतला आहे. गेल्या कांहीं वर्षांत अधिकाधिक अमेरिकन लोक ह्या बाबतींत लक्ष घालूं लागल्यानें रशिआकडून अमेरिकन यंत्रसामग्रीसाठी मागणीहि अधिक येऊं लागली आहे.

चंद्रावरील स्वारीचा धोका—अमेरिकेमधील एका शास्त्रज्ञानें चंद्राच्या पृष्ठभागाचा सखोल अभ्यास करून चंद्रावरील स्वारीबाबत धोक्याचा इशारा दिला आहे. त्याच्या मतानें चंद्रावर उतरणारें कोठलेंहि अंतरिक्षयान तेथील भूमींत खोल बुडण्याचा संभव आहे. चंद्रावरील स्वारीच्या बाबतींत असणाऱ्या धोक्यांत ही नवी भर आहे.

के. श्री. ग. रा. ऊर्फ बाबूराव साठे, बिस्किट कारखानदार यांना

सादर-श्रद्धांजलि

(श्री. नी. ना. क्षीरसागर, पुणें)

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध प्रथितयश बिस्किट कारखानदार श्री. गणपतराव साठे यांना सोमवार दि. १० एप्रिल, १९६१ रोजीं देवाज्ञा झाली याबद्दल त्यांचे कुटुंबियांचेबरोबर इतर सर्वत्रांस हळहळ व दुःख वाटत आहे. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यासंबंधीं कळकळ बाळगणारा एक बहुमोल कार्यकर्ता नाहींसा झाल्यानें ही हानि लौकर भरून येण्याजोगी नाहीं. श्री. गणपतराव यांचा जीवनपट पाहिला तर अक्षरशः शून्यांतून त्यांनीं आपले बाजारांतील मिळविलेल्या पतीच्या व नीतिमत्तेच्या अधिष्ठानावर आजचा कार्याचा विस्तार उभारला आहे, हें दिसून येईल.

कारखान्याची सुरुवात व वाढ

चित्रशाळेजवळील सदाशिव १०२७ या त्यावेळच्या आमच्या वाड्यांत यंत्रसामग्रीवर बिस्किटें तयार करून हा कारखाना 'साठे बंधू' बिस्किट कारखानदार या नांवानें ओळखला जात असे. वाड्याच्या आंतील बाजूस ५०′ × २५′ अशी पत्र्याची शेड, राहण्यासाठी ३ खोल्या व रस्त्यावर दोन खणाचें ऑफीस व मालविक्रीची व्यवस्था अशी त्यांच्या कार्याची व्याप्ति होती. मालाचे मागणीप्रमाणें व कारखान्याचे वाढीचे योजनेस अनुसरून, पुण्यांत, लष्करांत, नाझरथ बिस्किट कारखाना (बंद असलेला) त्यांच्या नजरेसमोर आला. त्या कारखान्याची व्यवस्था कै. बॅ. गाडगीळ यांचेकडे होती. तो कारखाना जागा व यंत्रसामग्रीसह घ्यावा असा विचार ठरल्यावर एकदम पैशाचा प्रश्न कसा सोडवावयाचा ? तथापि बॅ. गाडगीळ यांचेशीं झालेल्या व्यवस्थेप्रमाणें खरेदीची रक्कम दरसाल हप्त्यानें द्यावयाची असें ठरलें. या हप्त्यांच्या सवलती हें सुद्धां सन १९२९–३० च्या परिस्थितींत श्री. गणपतरावांचें धाडसच होतें. या कारखान्याच्या खरेदी खताच्या अटीप्रमाणें रु. २,०१० चा पहिला हप्ता पुणें मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेत लेखक एजंट असतांना कर्जव्यवस्था करून भरण्याची व्यवस्था झाली. ही आठवण लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, श्री. गणपतराव यांना आर्थिक प्रतिकूल परिस्थितींतून कसे मार्ग आक्रमावे लागले हें दिसून येईल. या किरकोळ बाबींचा उल्लेख ते मजजवळ प्रसंगोपात करीत असत.

भवानी पेठेंतील कारखान्याचें उद्घाटन

श्री. गणपतराव यांच्या भवानी पेठेंतील मालकीच्या जागेंतील कारखाना आधुनिक यंत्रसामग्रीनें सुसज्ज असा झाला. त्या कारखान्याच्या उद्घाटनाच्या प्रसंगीं मुख्य पाहुणे त्यावेळचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. अडवानी हे होते. अध्यक्षीय भाषणांत श्री. अडवानी यांनीं एक महत्त्वपूर्ण उल्लेख व सूचना केली कीं, देशांतील उद्योगधंद्यांना भांडवलपुरवठा करण्यासाठी एखादी इंडस्ट्रिअल बँकेची स्थापना झाल्यास हा भांडवलपुरवठ्याचा प्रश्न सुटूं शकेल. या भाषणांतील सूचनेचा विचार करून मी पुण्यामध्यें अशी इंडस्ट्रिअल बँक निघूं शकेल का ? असा विचार व सल्लामसलत घेतां, अशी बँक काढल्यास तिला स्थानिक पाठिंबा मिळेल अशी परिस्थिति होती. हा विश्वास, १९३५ मध्यें नुकतीच स्थापन झालेली बँक ऑफ महाराष्ट्र लि. या बँकेस मिळालेल्या पाठबळानें दृढ झाला व बँकेच्या तयारीची योजना हातीं घेतली.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. ची स्थापना

१९३६च्या मार्च-एप्रिलच्या सुमारास इंडस्ट्रिअल बँकेची योजना मी श्री. गणपतराव यांचेपुढें मांडली व तुम्ही या बँकेचे पहिले डायरेक्टर व्हावयास पाहिजे, अशी त्यांना विनंती करतांच आर्थिक परिस्थिति अनुकूल नसतांनासुद्धां त्यांनीं डायरेक्टरचे क्वालिफिकेशन शेअर्स रु. ६,००० चे घेण्यास मान्यता देऊन रु. १,५०० चा चेक लगेच माझ्या हातीं दिला. ही योजना त्या वेळचे माझे सहकारी श्री. दा. ग. बापट व श्री. चिं. त्रिं. चितळे यांनाहि मान्य होऊन आम्ही सर्वांनीं प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. १९ नोव्हेंबर १९३६ रोजीं नोंदविली. प्रेसिडेन्सी बँकेनें आपल्या ध्येयाप्रमाणें उद्योगधंद्यास साहाय्य देऊन जे अनेक कारखाने-उभारणीस मदत केली त्यांतील सावळे आणि कंपनी हा पाकिटांचा पहिला कारखाना होय. या कारखान्यांतील जर्मन मशीन प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेनें साहाय्य देऊन आणविलेलें आहे.

कृतज्ञता

शेवटीं माझ्या एका व्यक्तिगत प्रसंगाची आठवण येथें नमूद करून मी ही श्रद्धांजली संपविणार आहें. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्याच्या ध्येयवादित्वामुळें महाराष्ट्रांत ज्या ज्या कंपन्या १९३८ ते १९५० पर्यंत स्थापन झाल्या त्या कंपन्या-उभारणीसाठीं साहाय्य करण्याच्या दृष्टीनें सुमारें १६,००० रु. चे शेअर्स मी खरेदी केले होते. सन १९४०–१९४१चे दरम्यान माझ्या आर्थिक अडचणींचा कळस झाला व या प्रसंगीं माझ्या शेअर्सची विक्री होऊन मिळाल्यास मला ती मदतच होणार होती. पण त्या शेअर्सना मागणी नसल्यामुळें त्यांची विक्री होणार कशी ? मी माझेकडील शेअर्स असलेल्या कंपन्यांची यादी श्री. गणपतरावांचेकडे घेऊन गेलों व त्यांतील शेअर्स आपण घेऊं शकत असल्यास मला योग्य वेळीं मदत होणार आहे, असें सूचित करतांच त्यांतील कांहीं शेअर्सच्या भरलेल्या रकमेचा चेक त्यांनीं ताबडतोब देऊन मला अत्यंत अडचणीचे वेळीं मदत केली, याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय माझ्याच्यानें राहावत नाहीं.

श्री. गणपतरावांचे अनेक संस्थांशीं संबंध आले असल्यानें ठिकठिकाणीं त्यांनीं आपल्या गुणवैशिष्ट्यानें प्रत्येकास आपलेसे करून ठेविलें आहे; असा गुणी व सौजन्यशील मित्र नाहींसा झाल्यानें माझेप्रमाणें इतरांनाहि दुःख होणें साहजिकच आहे.

परमेश्वर त्यांचे आत्म्यास अखंड शांति देवो ! ही प्रार्थना करून ही श्रद्धांजलि अर्पण करतों.

कॉर्पोरेशनच्या जादा भाड्याबद्दल तक्रार

अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें स्थापन केलेल्या औद्योगिक वसाहतींत कांहीं एंजिनिअरिंगच्या कारखान्यांनीं जागा घेतल्या आहेत. ह्या जागांसाठी कॉर्पोरेशन आकारीत असलेलें भाडें जबर असल्याची तक्रार कारखान्यांच्या मध्यवर्ती संघटनेतर्फे करण्यांत आली आहे. इतकें जबर भाडें भारतांत इतर कोठेंहि घेण्यांत येत नाहीं असें संघटनेचें म्हणणें आहे. ही औद्योगिक वसाहत अहमदाबादमध्यें छोट्या उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी स्थापन करण्यांत आली असून कॉर्पोरेशन आकारीत असलेल्या भाड्यामुळें मूळ हेतु साध्य होणार नाहीं असें संघटनेचें मत आहे. कमिशनरनें ह्या प्रश्नाचा फेरविचार करावा अशी विनंती करण्यांत आली आहे.

बँकांच्या विलिनीकरणांत उद्भवणारे प्रश्न

ठेवींच्या परतफेडीची व्यवस्था

पुण्यांतील चार बँका आणि मालवण येथील बँक ऑफ कोकण लि. ह्यांच्या विलिनीकरणाच्या घोषणा रिझर्व्ह बँकेनें केल्या आहेत. ह्या सर्व बँकांचे ठेवीदार, भागीदार, कर्जदार व नोकर आपलें भवितव्य समजण्याची वाट पाहात आहेत. प्रत्येक बँकेची घटना व परिस्थिति लक्षांत घेऊन विलिनीकरणाच्या योजना तयार केल्या जात असून संबंधित बँकांचेकडे त्या लवकरच पाठविल्या जातील असें समजतें. ह्या योजना मसुद्याच्या स्वरूपाच्या आहेत आणि संबंधित बँकांच्या कांहीं सूचना असल्यास त्यांचा विचार करून त्या पक्क्या केल्या जातील. सध्यां विलीन होणाऱ्या बँकांच्या हिशेबतपासणीचें काम चालूं आहे, आणि लवकरच ठेवीदार आणि भागीदार ह्यांच्या देण्याच्या व्यवस्थेविषयीं निश्चित कल्पना देण्याजोगी परिस्थिति निर्माण होईल. दि बँक ऑफ नागपूर लि. चें दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. मध्यें ज्या योजनेनुसार विलिनीकरण झालें, त्याच प्रकारच्या योजनेनुसार ह्याहि बँकांचें विलिनीकरण होईल, हें उघड आहे. त्या योजनेचें स्वरूप सामान्यत: खालीलप्रमाणें राहील.—

विलीन होणाऱ्या बँकेला 'ट्रॅन्स्फरर बँक' आणि विलीन करून घेणाऱ्या बँकेला 'ट्रॅन्स्फरी बँक' संबोधण्यांत येईल.

विवक्षित तारखेला ट्रॅन्स्फरर बँकेचीं सर्व येणीं व जिंदगी ट्रॅन्स्फरी बँकेकडे वर्ग होतील.

ट्रॅन्स्फरर बँकेचा ताळेबंद मोरेटोरियम सुरू झाला, त्याच्या आधल्या दिवशींचा तयार करण्यांत येईल; त्यावरून मूल्यमापन केलें जाईल. हा ताळेबंद रिझर्व्ह बँकेनें मान्यता दिलेल्या ऑडिटरांकडून तपासून घ्यावा लागेल.

ट्रॅन्स्फरी बँक ट्रॅन्स्फरर बँकेशीं चर्चा व वाटाघाटी करून येणें व जिंदगी ह्यांचें मूल्यमापन करील आणि देणेंहि निश्चित ठरवील. ह्या संबंधांत उभयपक्षीं मतैक्य न झाल्यास रिझर्व्ह बँकेचा निर्णय हा अखेरचा व बंधनकारक राहील.

सरकारी रोखे, डिबेंचर्स, शेअर्स, इत्यादींची बाजारभावाची किंमत धरण्यांत येईल. पो. ऑ. सर्टिफिकिटें, ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें, इत्यादि अल्पबचतीच्या रोख्यांची दर्शनी किंमत हिशेबांत घेतली जाईल. बँकेच्या स्थावर मालमत्तेची चालू बाजारभावानें होणारी किंमत मूल्यमापनांत धरली जाईल. फर्निचर, वगैरेंचा मूळ किंमतींतून घसारा काढला जाईल.

मूल्यमापनांत बँकेच्या देण्यापेक्षा येणें कमी आढळल्यास, ज्या प्रमाणांत येण्याचें देण्याशीं प्रमाण निघेल, त्या प्रमाणांत ठेवींची रक्कम हिस्सेराशीनें कमी होईल व ह्या कमी झालेल्या रकमेनें ट्रॅन्स्फरी बँकेंत ठेवीदारांचीं खातीं उघडलीं जातील. २५० रुपयांपर्यंतच्या ठेवी पूर्णपणें भागविल्या जातील; हिस्सेरशी त्यापुढें लागू होईल. मूल्यमापनांत येणें हें देण्यापेक्षा जास्त आढळल्यास ठेवीदारांना पूर्ण रक्कम मिळून बाकीची रक्कम रोखीनें किंवा ट्रॅन्स्फरी बँकेच्या भागभांडवलाच्या रूपानें भागीदारांना मिळण्याची तरतूद आहे.

जीं कर्जें कालांतरानेंच वसूल होणारीं असतील अथवा संशयित व बुडित असतील, तीं मूल्यमापनांत घेतलीं जाणार नसल्यानें त्यांच्या वसुलीला बारा वर्षांचा कालावधि दिला जाईल. जसजशा रकमा वसूल होतील, तसतशा त्या वाटण्यांत येतील.

ट्रॅन्स्फरर बँकेचा सर्व नोकरवर्ग (मुख्याधिकारी सोडून) ट्रॅन्स्फरी बँकेमध्यें त्याच्या चालू वेतनावर व अटींवर समाविष्ट केला जाईल. तीन वर्षांनंतर ट्रॅन्स्फरी बँकेची वेतनश्रेणी व नोकरींचे नियम त्यांना लागू होतील.

मूल्यमापनाचा सर्वसाधारण आराखडा अशा स्वरूपाचा असला, तरी ट्रॅन्स्फरी बँकेला सहानुभूति दाखविण्यास भरपूर वाव आहे. कारण, त्या बँकेनें केलेलें मूल्यमापन हेंच विलिनीकरणाचा आधार होणार आहे. विलीन होणाऱ्या बँकेची गुडविल विचारांत घेतली जाणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, सरकारी कर्जरोखे ठराविक मुदतीनंतर दर्शनी किंमतीनें परतफेड होणार असल्यानें, त्याबाबतहि इष्ट तो विचार व्हावा. विलिनीकरणाचे वेळीं इतर अधिकाऱ्यांप्रमाणें व नोकरांप्रमाणें मुख्याधिकाऱ्याची ट्रॅन्स्फरी बँकेत योजनेमध्येंच तरतूद केली जात नाहीं. ट्रॅन्स्फरी बँकेला अशा मुख्याधिकाऱ्यांनाहि समाविष्ट करून घेणें अवघड वाटण्याचें कारण नाहीं. विलिनीकरणामुळें सर्व बँकांचें व त्यांच्या घटकांचे हितसंबंध शक्य तितक्या समजूतदारपणें संभाळले जातील, अशी आशा आहे.

श्री. खंडागळे यांना निरोप

